दाखल दिनांक : २७/०५/२०१४
नोंदणी दिनांक : २७/०५/२०१४
निकाल दिनांक : ०६/०२/२०१५
कालावधी : ०० वर्ष.
०९ महिने.
०९ दिवस.

**विशेष न्यायाधीश पुणे (लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कायदयाअंतर्गत) यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी— सौ. प्राची पी कुलकर्णी)

**स्पेशल केस कमांक १२१/२०१४** **निशाणी कमांक**

**फिर्यादी** — महाराष्ट्र सरकार
तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे

**विरुध्द**

**आरोपी** — अमोल दिलीप इंगळे
वय — २४ वर्ष, धंदा — नोकरी
रा. मु.पो. कनगरा, ता. उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद

**भारतीय दंड विधान कलम ५०९ व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११ सह कलम १२ अन्वये असलेला गुन्हयाचा खटला**

..........................................................................................

सहायक सरकारी वकील श्रीमती बारी फिर्यादी पक्षातर्फे
आरोपीतर्फे श्री ढोकणे वकील

---

**न्या य नि र्ण य**
(आज दिनांक ६ फेब्रुवारी २०१५ रोजी घोषित)

आरोपी विरूध्द् भारतीय दंड विधान कलम ५०९ तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११ सह कलम १२ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला.

२) अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे आहे. फिर्यादी अनिल कृष्णाजी माने रा. आर ॲन्ड डी ई इंजिनियर्स कॉलनी, पुणे आळंदी रोड कळस पुणे येथे राहण्यास असून त्यांच्या घरी त्यांची पत्नी व मुलगी नामे पल्लवी वय — १३ वर्ष ही राहण्यास आहे. पल्लवी ही दररोज एमएससीआयटी क्लास करीता सायंकाळी

४.०० ते ४.४५ वाजता पायी जात असे. तीचे सोबत तीची मैत्रिण संजना ही देखील सदर क्लासला जात असे. दिनांक २४/४/१४ रोजी सायंकाळी ४.५० वाजता ते व त्यांचा मित्र असे दोघे कामानिमित्त मच्छी मार्केट विश्रांतवाडी या ठिकाणी आले असता त्यांना एक मुलगा दु व्हीलरने त्यांची मुलगी पलीवी व तीची मैत्रीण संजानाच्या मागेमागे जात असतांना दिसला. आर ॲन्ड डी कॉलनी गेट कळस येथे तो मुलगा त्याच्या मुलीच्या समोर उभा असलेला दिसला त्यानंतर त्याने सदर प्रकाराबाबत विचारणा केली असता मुलीने त्यांना सांगितले की सदरच्या मुलाला ती ओळखत नसून तो गेले महिन्यापासून दररोज तीच्या पाठीमागे येतो व तीच्याकडे पाहून हासतो घाणेरडे हावभाव करतो व हातवारे करतो तीच्या जवळून मोटारसायकल नेतो. असे सांगितल्यावर त्यांनी १०० नंबरवर फोन करून पोलीसांना बोलावून सदर इसमास पोलीसांच्या ताब्यात दिले. चौकशी अंती सदर मुलाने त्याचे नाव अमोल दिलीप इंगळे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी सदर इसमाविरूध्द् आळंदी पोलीस चौकीत फिर्याद दिली.

३) सदर फिर्यादीवरून आरोपीविरूध्द् गुन्हा क्रमांक ३०६५/२०१४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एम एच शेख यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, आरोपीला अटक केली, पिडीत मुलीचा व साक्षीदारांचे जाबजबाब घेतले, पिडीत मुलीच्या वयाचा पुरावा प्राप्त केला व गुन्हयाचा तपास पुर्ण करून आरोपीविरूध्द् न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

४) या न्यायालयाने आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ५०९ तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११ सह कलम १२ अन्वये निशाणी क्रमांक २ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपीने त्याच्याावर असलेले आरोप नाकारले व खटल्याच्या सुनावणीची मागणी केली. त्याविषयीची त्याची जबानी निशाणी ३ नुसार नोंदविण्यात आली.

५) प्रस्तूत खटल्यामध्ये आरोपी विरूध्द्चा गुन्हा सिध्द् करण्याकरीतात अभियोग पक्षाने साक्षीदार क्रमांक १ पिडीत मुलगी पल्लवी अनिल माने हिची साक्ष निशाणी ६ प्रमाणे नोंदविली. साक्षीदार क्रमांक २ अनिल कृष्णाजी माने यांची साक्ष

निशाणी ७ प्रमाणे नोंदविण्यात आली. या साक्षीदारांनी आरोपी विरूध्द् काहीही न सांगितल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सरकार पक्षाने नोंदविलेल्या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूध्द् काहीही न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६) वरील सर्व बाबींवरून खालील मुददे माझया विचारार्थ उपस्थीत झाले. त्या मुदयांवरील निष्कर्ष खाली दिलेल्या कारणमिमांसेत मी नमुद केलेले आहेत.

| | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| .१ | थ्दनांक २४/४/१४ रोजी सायंकाळी ४.४५ वाजण्याच्या सुमारास आर ॲन्ड डी ई कॉलनी, कळस पुणे येथे आरोपीने पिडीत मुलगी पल्लवी अनिल माने हिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तीचा पाठलाग करून तीचेकडे पाहून घाणेरडे हावभाव करून तीच्या पाहुन हसणे, मोटारसायकल आडवी लावली व तीच्या एकांतपणाचा भंग केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय? | ..... नाही |
| .२ | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने अल्पवयीन पिडीत मुलगी पल्लवी माने हिची लैंगिक छहवणूक करण्याच्या उद्देशाने तीचा सतत दुचाकीवर पाठलाग केला, तीच्याकडे पाहून हसलात व घाणेरडे हावभाव केले व गाडी आडवी लावून तीच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला व त्यायोगे लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ११ सह कलम १२ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय? | ..... नाही |
| ३ | काय आदेश ? | ..... अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा कमांक १ ते ३ करीता</u> —**

७) आरोपीविरूध्द् दोषारोप ठेवण्यात आलेले सर्व मुद्दे एकाच घटनेतून उद्भवले असल्याने त्यांचा एकत्रित विचार केला आहे. आरोपी विरूध्द्चा गुन्हा सिध्द् करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ पल्लवी अनिल माने हिची साक्ष नोंदवली. तीने आपल्यासाक्षीमध्ये सांगितले की तीची जन्मतारीख १३/१०/२०००

अशी आहे. घटनेच्या वेळी ती आर ॲन्ड डी ई शाळेत इयत्ता आठवीत शिकत होती. घटनेपुर्वी एक व्यक्ती जो अधून मधून तीच्या मागे येत असे व तीच्याकडे पाहून हसत असे व चेह—याचे वाईट हावभाव करत असे. त्यामुळे तीला भिती वाटत असे. घटनेच्या दिवशी तीच्या बरोबर तीची मैत्रिण संजना होती. त्यावेळी त्या दोघी एम एस सी आय टी च्या क्लाससाठी विश्रांतवाडी येथे चालल्या होत्या. सदरची व्यक्ती तीच्या पाठीमागून स्कुटीवर आली व तीच्या जवळ येवून थांबली व तीच्याशी बोलण्याचा प्रयत्न करू लागली. त्यामुळे ती घाबरली. तीने सदर मुलाला काय चालले आहे असे जोरात विचारले त्यामुळे लोक तिथे जमा झाले . घरी जाउन तीने वडीलांना सर्व हकीगत सांगितली. वडीलांनी घटना बघीतली नाही. परंतु या साक्षीदाराने कोर्टासमोरील आरोपी हा तोच व्यक्ती आहे का हे सांगता येणार नसलयाचे सांगितले आहे. तसेच आरोपीला तीच्या समोर लोकांनी पकडले व मारहाण केली असे काही घ ाडले नसलयाचे तीने सांगितले आहे.

८) साक्षीदार क्रमांक २ अनिल कृष्णाजी माने हे पिडीत मुलीचे वडील आहेत. त्यांनी सरकार पक्षास मदत केली नाही. त्यांनी आपल्या साक्षीमध्ये असे सांगितले की पल्लवी ही त्यांची मुलगी आहे. दिनांक २४/४/१४ रोजी संध्याकाळी ६. ३० वाजता पल्लवीला कोणतरी छेडले असे त्यांना समजले. ही घटना पल्लवीने त्यांना घरी आल्यावर सांगितली. ते घटनास्थळी जाई पर्यंत संबंधीत व्यक्तीला पोलीस स्अेशनमध्ये घेवून गेले होते. त्यांनी पोलीस स्अेशनमध्ये फिर्याद दिल्याचे मान्य केले आहे. ते असेही सांगतात की घटना प्रत्यक्ष घडतांना त्यांनी पाहिली नाही. त्यामुळे या साक्षीदाराला फितूर घोषित करून सरकारी वकीलांनी त्यांचा उलटतपास घेतला परंतु उलटतपासात दिनांक २४/४/१४ रोजी ते मित्रासह रस्त्याने जात असतांना त्यांनी पाहिले की आरोपीने त्यांची मुलगी पल्लवी हिला रस्त्यात आडवून तीच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांनी व मित्राने १०० नंबरला फोन करून पोलीसांना बोलावले व सदर इसमाला पोलीसांच्या ताब्यात दिले असे काही घडले नसलयाचे सांगितले.

९) पिडीत मुलगी पल्लवी व फिर्यादी यांच्या पुराव्याचे अवलोकन करता त्यांनी आरोपी विरूध्द् काहीही सांगितलेले नाही. पिडीत मुलीला व

फिर्यादीलाच आरोपी विरूध्द् कसलीही तक्रार नाही. या दोन साक्षीदारांच्या पुराव्या व्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे आरोपीनेच पिडीत मुलीचा पाठलाग केला, तीच्याकडे पाहून घाणेरडे हावभाव केले व तीला गाडी आडवी लावून तीच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला असे शाबीत होत नाही. अभियोग पक्षाचा पुरावा आरोपी विरूध्द्चा गुन्हा शाबीत करण्यास पुरेसा नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ व २ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरादाखल मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे —

## **आदेश**

१. आरोपी अमोल दिलीप इंगळे याला भारतीय दंड विधान कलम ५०९ तसेच लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ११ सह कलम १२ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष सोडण्यात येत आहे.

२. त्याचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ अ अन्वये रूपये १५०००/— चा जामीन बंधपत्र दयावा.

पुणे
दिनांक — ०७/०२/२०१५

(सौ प्राची पी. कुलकर्णी)
विशेष न्यायाधीश, पुणे
लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून
सरंक्षण कायदयाअंतर्गत

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word for word as per original Judgment.

**Name of Stenographer : Smt. M.R. Saptarshi**

**Court Name : Sou. Prachi P. Kulkarni**
**District Judge – 1 & Special Judge**
**Pune**

**Date of Judgment – 7/2/2015**

**Judgment signed by the Presiding officer –7/2/2015**

**Judgment uploaded on - 9/2/2015**